माहितीचा अधिकार

"निर्गमित"

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**दाखल झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- १८४/२०१५**

तक्रारकर्ता श्री.अनिल शंकरराव अंबुसकर,
रा.वार्ड क्र.०२, खरेदी विक्री संघामागे, नांदुरा, जि.बुलडाणा

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय नांदुरा, जि.बुलडाणा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय नांदुरा, जि.बुलडाणा

**तक्रार सुनावणी दिनांक – १४/१०/१९**

तक्रारदार श्री.अनिल शंकरराव अंबुसकर यांनी दिनांक २१/९/१५ रोजी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार राज्य माहिती आयोगाचे स्तरावर तक्रार अर्ज दाखल केला. प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने, तक्रारदार तसेच उत्तरवादी यांना दि.२६/८/१९ रोजी सुचनापत्र निर्गत करुन आज दि.१४/१०/१९ रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. सदर सुनावणीस उत्तरवादी गैरहजर आहेत. तसेच तक्रारदार गैरहजर आहेत.

सदर सुनावणीस तक्रारदार गैरहजर आहेत. सबब, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ९, नियम ८ नुसार प्रकरण पुढील कोणत्याही सुनावणीशिवाय बंद करण्यात येत आहे.

तक्रारदार यांनी हा आदेश पारित करण्याच्या दिनांकापासुन जर ३० दिवसाच्या आत पुनः समर्थनिय कारणासह दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ९, नियम ९ नुसार अर्ज करुन विनंती केल्यास प्रकरणात नव्याने सुनावणी लावण्यात येईल. सबब, तसा आदेश पारीत करण्यात येत आहे. याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

(संभाजी सरकुंडे)
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.त.१८४/२०१५/००५९/२०१९, दिनांक-२०/१२/२०१९